• वर्ष : ०३ • अंक : २२८ • पुणे • शनिवार, दि. ९ मे २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





धायरी शिवणे भाजपा मंडल कार्यकारणी बैठक संपन्न 3




विवो X300 FE चे भारतात अनावरण 4

# वित्तीय समितीबाबत मोठा निर्णय

## विकासकामांना विलंब होत असल्याने वित्तीय समिती बरखास्त करण्याची नगरसेवकांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वित्तीय समितीच्या मंजुरीमुळे विकासकामांना विलंब होत असल्याने ही समिती बरखास्त करण्याची मागणी नगरसेवकांकडून करण्यात येत असताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी वित्तीय समिती रद्द न करता आता एक कोटी रुपयांपर्यंतच्या कामांसाठी या समितीची मंजुरी आवश्यक नसल्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेऊन महापालिका आयुक्तांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनात समतोल राखण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले आहे.



विकासकामांना विलंब होत असल्याने वित्तीय समिती बरखास्त करण्याची नगरसेवकांची मागणी आयुक्त राम यांनी फेटाळून लावली होती. त्यावरून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात वादाची परिस्थिती निर्माण झाली असताना, स्थायी समितीने क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर २५ लाख रुपयांपर्यंतच्या कामांना वित्तीय समितीच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याचा निर्णय घेतला. आता महापालिका आयुक्तांनी ही मर्यादा वाढवून एक कोटी रुपये केली आहे. मात्र, वित्तीय समिती ही कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेच्या अर्थसंकल्पातील तूट तीन हजार कोटी रुपयांच्या पुढे जात आहे. महापालिकेचे उत्पन्न सरासरी दहा टक्क्याने वाढत असताना प्रशासन आणि त्यानंतर स्थायी समितीने अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे.

करोनाच्या काळात खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी तत्कालीन आयुक्तांनी वित्तीय समितीची स्थापना केली. यामध्ये पालिकेतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ही समिती कामांचे प्राधान्यक्रम ठरवित किती खर्च करायचा, याचा निर्णय घेते. या समितीमुळे अनावश्यक खर्च कमी होऊन निधीची बचत झाली. त्यामुळे करोनानंतर देखील महापालिका प्रशासनाने वित्तीय समिती कायम ठेवली. दहा लाख रुपयांच्या कामांचा देखील यामध्ये प्राधान्यक्रम ठरविला जात होता.

चार वर्षांच्या प्रशासक राज नंतर निवडणूक होऊन महापालिकेचे सभागृह अस्तित्वात आले. वित्तीय समितीच्या मान्यतेमुळे कामांना उशीर होत असल्याची तक्रार करत सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनीच ही समिती बरखास्त करण्याची मागणी केली. मात्र, ही समिती बरखास्त करणार नाही, अशी भूमिका महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी जाहीरपणे घेतली होती. यावरून सत्ताधारी विरुद्ध प्रशासन अशी धुसफूस सुरू होती.



## नेरळ-शिरूर १३४ किलोमीटर चौपदरी महामार्गाला मंजुरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई, पुणे, मराठवाडा आणि अहिल्यानगर या महत्त्वाच्या भागांना अधिक वेगवान, सक्षम आणि आधुनिक दळणवळण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने नेरळ-वांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मळठण-शिरूर या १३४ किलोमीटर लांबीच्या चौपदरी महामार्ग प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पुणे-शिरूर मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार असून मुंबई आणि जेएनपीटी बंदराशी थेट संपर्क निर्माण होणार आहे. राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला गती देणारा हा महामार्ग प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे मानले जात आहे. विशेषतः रायगड, पुणे, मराठवाडा आणि अहिल्यानगर परिसरातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून व्यापार, उद्योग आणि गुंतवणुकीसाठी नवे मार्ग खुले होणार आहेत. राज्याच्या विकासाला नवी दिशा देणारा आणि उद्योग, रोजगार तसेच दळणवळण क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणणारा हा महामार्ग प्रकल्प भविष्यात महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## ठळक बातम्या

### सेवा रस्त्याचे काम निकृष्ट?

पिंपरी (आरंभ पर्व) : पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड दरम्यान सेवा रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने केले जात आहे. किवळे येथे रस्त्यांचे काम निकृष्ट झाले आहे. येत्या १५ दिवसांत सद्य:स्थितीतील निकृष्ट काम पूर्णपणे काढून टाकून नव्याने दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याची सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिली. महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड येथील मुळा नदीवरील पुलापर्यंत दोन्ही बाजूस सेवा रस्त्यांचा विस्तार करण्यात येणार आहे. १२ मीटर अंतराने रस्त्याचा विस्तार करण्याचा आराखडा भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तयार केला आहे. त्यानुसार काम सुरू करण्यात आले आहे. या कामाची खासदार बारणे यांनी पाहणी केली. यावेळी शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक निलेश तरस, नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस, युवासेना मावळ लोकसभा राजेंद्र तरस यांच्यासह महामार्ग विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### पाणीपुरवठा विस्कळीत का?

पिंपरी (आरंभ पर्व) : वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढली असून, शहराच्या विविध भागांतून अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ होऊ लागल्याने महापालिकेच्या नळाला विद्युत मोटार पंप जोडून पाणी घेणाऱ्यांवर पाणीपुरवठा विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. नळाला विद्युत मोटार पंप जोडून पाणी घेणाऱ्या पिंपळे निलखमधील १४, थेरगाव येथील पवारनगर, पडवळनगरमध्ये नऊ अशा २३ मोटार पंप जप्त केले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, काळेवाडी, किवळे, सांगवी, वाल्हेकरवाडीसह शहराच्या विविध भागांत पाणीपुरवठा अपुरा आणि कमी दाबाने होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. विस्कळीत, अपुरा, अवेळी पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. नागरिक दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावर अनधिकृतपणे महापालिकेच्या नळजोडाला इलेक्ट्रिक विद्युत मोटार जोडून मोठ्या प्रमाणात पाणीउपसा करतात. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांच्या तक्रारी वाढल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

### पुण्यात सीएनजी महागला!

पुणे (आरंभ पर्व) : वाहनांसाठी स्वस्त इंधनाचा पर्याय असलेला सीएनजी आता प्रतिकिलो दीड रुपयाने महागणार आहे. शुक्रवारी (८ मे) मध्यरात्रीपासून एक किलो सीएनजीसाठी ९२ रुपये २५ पैसे मोजावे लागणार असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह चाकण, तळेगाव, हिंजवडी परिसरातील वाहनधारकांना या दरवाढीचा फटका बसणार आहे.

## क्षमतेपेक्षा जास्त लोकांमुळे लिफ्ट अडकली, सात जणांची सुटका

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

नवी सांगवी येथील एका इमारतीच्या लिफ्टमध्ये (उद्वाहक) पहाटे पावणेतीनच्या सुमारास सात जण अडकल्याची घटना घडली. क्षमतेपेक्षा जास्त लोक असल्याने लिफ्ट तांत्रिक बिघाड होऊन बंद पडली. पहिल्या आणि तळमजल्याच्या मध्ये लिफ्ट अडकली. तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रहाटणी अग्निशामक दलाच्या जवानांनी सर्वांची सुखरूप सुटका केली. नवी सांगवी येथे आशा शंकर प्लाझा ही इमारत आहे. तेथून रात्री दोनच्या सुमारास सर्वजण बाहेर निघाले होते. तिसऱ्या मजल्यावर सात जण लिफ्टमध्ये चढले. या लिफ्टची क्षमता पाच व्यक्तींची असताना लिफ्टमध्ये सात जण गेले. क्षमतेपेक्षा जास्त वजन झाल्याने लिफ्ट तळमजला आणि पहिल्या मजल्याच्या दरम्यान अचानक अडकली. इमारतीतील स्थानिक रहिवाशांनी त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना अपयश आले. त्यामुळे अडीचच्या सुमारास महापालिकेच्या रहाटणी अग्निशामक केंद्राला हा प्रकार कळविण्यात आला. अग्निशामक दलाचे बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. लिफ्टमध्ये क्षमतेपेक्षा जास्त जण असल्याने यंत्रणेवर ताण आला होता. गच्चीवरील कंट्रोल रूममधून लिफ्ट खाली घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यामध्ये अपयश आले. सोसायटीने बोपोडीहून लिफ्ट मेंटेनन्स कर्मचाऱ्यांना बोलावले. मात्र, त्यांनाही दरवाजा उघडता आला नाही.



## बालकांवर अत्याचार व खून करणाऱ्या आरोपींना फाशीची मागणी

### भीमशक्ती संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

नसरापूर (ता. भोर) व खालुंब्रे (ता. खेड) येथे अल्पवयीन बालकांवर अत्याचार करून खून केल्याच्या संतापजनक घटनांच्या निषेधार्थ येथील भीमशक्ती संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आला, तर खालुंब्रे येथे चार वर्षांच्या बालकावर अमानुष अत्याचार करून हत्या करण्यात आल्याच्या घटनांनी परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर भीमशक्ती संघटनेने आंदोलन करत निषेध नोंदविला. या आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस, तालुकाध्यक्ष अनिल जाधव, सचिव के. डी. जाधव यांच्यासह किशोर डोळस, संजय गायकवाड, सिद्धार्थ सरोदे, मंगेश जाधव, नितेश वाघमारे, मंगेश शिंदे, सिद्धार्थ भालेराव, विकास पडवळ, भुजंग झोगडत, नागेश शिंदे, आकाश घोडके आदी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

यावेळी संघटनेच्या पदाधिकार्यांनी, अशा प्रकारच्या अमानुष गुन्ह्यांवर आळा बसण्यासाठी आरोपींना कोणतीही दयामाया न दाखवता तात्काळ कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम भूमिका मांडली. तसेच अशा घटना रोखण्यासाठी राज्य शासनाने विद्यमान कायद्यांत अधिक कठोर तरतुदी करून स्वतंत्र कायदा लागू करावा, अशी मागणीही करण्यात आली. संघटनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले की, गंभीर गुन्ह्यांमध्ये तातडीने आणि




कठोर शिक्षा झाली तरच समाजात कायद्याबद्दल विश्वास निर्माण होईल. अन्यथा भीतीचे वातावरण वाढण्याची शक्यता आहे. शासनाने या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, याबाबत बोलताना भीमशक्ती संघटनेचे, पुणे जिल्हाध्यक्ष विजय डोळस म्हणाले, नसरापूर आणि खालुंब्रे येथील निष्पाप बालकांवरील अत्याचार हे मानवतेचा क्रूर अपमान आहे. अशा नराधमांना कोणतीही दया न दाखवता तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर कायदा लागू करणे अत्यंत आवश्यक आहे.

## छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी ३ कोटी २४ लाख रुपये

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डेक्कन जिमखाना परिसरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसराच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेने ३ कोटी २४ लाख रुपयांच्या कामाला मंजुरी दिली आहे. या कामात दगडी मेघडंबरी उभारणे, भुयारी मार्गाचे सुशोभीकरण, तसेच परिसर विकासाची विविध कामे केली जाणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. महापालिकेच्या भवन विभागाच्या वतीने हे काम केले जाणार आहे. या कामासाठी महापालिकेने ३ कोटी १२ लाख २३ हजार रुपयांचे पूर्वगणनपत्रक तयार केले होते. तांत्रिक छाननी समितीने २० नोव्हेंबर २०२५ रोजी या अंदाजपत्रकास मान्यता दिली होती. त्यानंतर २ कोटी ६३ लाख ९४ हजार रुपयांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानंतर हे काम देण्यात आले.




या प्रकल्पात स्मारक परिसरात मेघडंबरी दगडी बांधकामात उभारली जाणार आहे. तसेच, या भागातील भुयारी मार्ग अधिक आकर्षक करून परिसराचा विकास करण्यात येणार आहे. डेक्कन परिसराचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन स्मारकाचे जतन आणि सुशोभीकरण करण्यावर भर देण्यात येत असल्याचे भिमाले यांनी सांगितले.

या प्रकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे स्मारकाच्या ठिकाणी उभारण्यात येणारी भव्य 'दगडी मेघडंबरी' असणार आहे. पारंपारिक आणि रेखीव दगडी बांधकामात ही मेघडंबरी साकारली जाणार असून, त्यामुळे स्मारकाला एक ऐतिहासिक आणि राजेशाही स्वरूप प्राप्त होईल. केवळ मेघडंबरीच नाही, तर या परिसरातील महत्त्वाच्या भुयारी मार्गाचेही सुशोभीकरण केले जाणार आहे. भुयारी मार्गात आकर्षक रंगकाम, अद्ययावत प्रकाशयोजना आणि ऐतिहासिक संदर्भांची मांडणी करून तो प्रवाशांसाठी अधिक सुखकर आणि प्रेक्षणीय बनविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. महापालिकेच्या भवन विभागामार्फत या संपूर्ण प्रकल्पाचे नियोजन आणि अंमलबजावणी केली जाणार आहे. या कामासाठी पालिकेने सुरुवातीला ३ कोटी १२ लाख २३ हजार रुपयांचे पूर्वगणनपत्रक तयार केले होते. या अंदाजपत्रकास तांत्रिक छाननी समितीने २० नोव्हेंबर २०२५ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून २ कोटी ६३ लाख ९४ हजार रुपयांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर आता हे काम प्रत्यक्ष सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अधिक माहिती देताना भिमाले म्हणाले, ' डेक्कन परिसराला पुण्याच्या इतिहासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक हे केवळ एक वास्तू नसून ते आपल्या सर्वांचे स्फूर्तिस्थान आहे. या स्मारकाचे जतन करणे आणि परिसराचा विकास करणे ही काळाची गरज आहे. ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊनच या सुशोभीकरणाचे डिझाइन तयार करण्यात आले आहे.'

या विकासकामामुळे परिसरातील पदपथ, स्वच्छता आणि सुशोभीकरण यामुळे पर्यटकांच्या संख्येतही वाढ होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे शिवप्रेमी आणि पुणेकर नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. लवकरच या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊन डेक्कन परिसराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



## डॉ. अस्मिता ताई जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिर संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : समाजाप्रती कृतज्ञता आणि सेवाभाव जपत डॉ. अस्मिता ताई जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त आंबेगाव पोलीस स्टेशन, भारतीय विद्यापीठ पोलीस स्टेशन तसेच वाहतूक विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला पोलीस कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात शंभरहून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. बीपी, शुगर, ईसीजी, उंची-वजन, हाडांची तपासणी तसेच त्वचारोग तपासणी आदी विविध चाचण्या करण्यात आल्या. विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी कर्मचाऱ्यांची तपासणी करून योग्य आरोग्य सल्ला दिला. कार्यक्रमाला एसीपी विजय कुंभार, एसीपी राहुल आवारे, आंबेगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद जीने तसेच क्राईम पीआय गजानन चोरमुले यांची प्रमुख उपस्थिती होती. आंबेगाव पोलीस स्टेशनचा संपूर्ण स्टाफ यावेळी उपस्थित होता. या आरोग्य शिबिराचे आयोजन सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष दिपक हरिभाऊ चौघुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. तसेच अनिल चौघुले, सारिका लोणकर, कुलदीप नाईक नवरे, पद्मजा गव्हाणे, हरिभाऊ दळवी आणि अनिता चौघुले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. या शिबिरासाठी जीवनधारा मल्टिपल स्पेशलिस्ट हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले. समाजाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.

## शरदचंद्रजी पवार प्रशालेचा एसएससी परीक्षेत ९५ टक्के निकाल

- विद्यार्थ्यांच्या यशाने परिसरात आनंदोत्सव

बार्शी (आरंभ पर्व) : सारोळे ता. बार्शी येथील शरदचंद्रजी पवार प्रशाला यांनी एसएससी परीक्षा सन २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल ९५ टक्के निकाल नोंदविला आहे. प्रशालेच्या या उज्वल यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत प्रशालेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली. यामध्ये कु. मोरे राजनंदिनी प्रमोद हिने ८५.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर कुमारी आवटे प्रियंका अंकुश हिने ८३.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु. भोसले सिद्धी धोंडीराम हिने ८३.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबा गायकवाड, संस्थापक सचिव लक्ष्मणराव गायकवाड, संस्थेचे संचालक, विलासदादा गाटे, मुख्याध्यापक दीपक खंदारे सर यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी यापुढेही मेहनत, जिद्द आणि शिस्त यांच्या जोरावर मोठे यश संपादन करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची चिकाटी यामुळेच हा यशस्वी निकाल शक्य झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. दरम्यान, प्रशालेत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात झाली असून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्ये आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे पालकांचा शाळेकडे वाढता कल दिसून येत आहे. "चला शिकूया... पुढे जाऊया... उज्ज्वल भविष्य घडवूया!" हा संदेश देत प्रशालेने यंदाच्या यशाचा आनंद साजरा केला.

## पुण्यात रंगणार 'अदा स्टार ऑफ महाराष्ट्र २०२६'चा दिमाखदार सोहळा

- ३००० महिलांची उपस्थिती आणि आकर्षक बक्षिसांची लयलूट!

पुणे (आरंभ पर्व) : महिलांच्या अंगभूत कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी 'अदा द फॅशन स्टुडिओ'च्या वतीने 'अदा स्टार ऑफ महाराष्ट्र 2026 – सीजन 5.0' या भव्य पारंपरिक फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे. हा दिमाखदार सोहळा सोमवार, दिनांक १७ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता पुण्यातील स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पुण्यातील नामवंत डिझाइनर आणि संस्थांनी साकारलेली वेशभूषा असणार आहे. यामध्ये विख्यात MNVTI डिझाइनर कॉलेज, वस्त्रवेद, द्रौपदी वस्त्रम आणि अनवी द रेंटल बुटीक यांचा समावेश आहे. या फॅशन शोसाठी ज्वेलरी पार्टनर म्हणून न्यू साईणकर ज्वेलर्स आणि स्वामिनी सारीज अँड ज्वेलरी यांनी सहभाग नोंदवला आहे. तसेच, स्पर्धकांचा साजश्रृंगार पुण्यातील प्रसिद्ध सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट माधुरी खेसे आणि त्यांच्या टीममार्फत केला जाणार आहे. केवळ फॅशनच नव्हे, तर समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव या व्यासपीठावर केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या आयोजिका सौ. निलम शेलार यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठीच कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध स्टॉल्सची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त कामगारांचा सन्मान सोहळा संपन्न



पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ज्ञानदीप फाउंडेशन धायरी यांच्यामार्फत ग्रामपंचायत कार्यालय येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सुरुवातीला ध्वजारोहण करून राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत घेण्यात आले त्यानंतर विविध क्षेत्रातील कामगारांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यामध्ये मनपा पुणे ,तळेगाव डेपो, एसटी डेपो,सी डब्ल्यू पी आर एस, खडकी डेपो , व महावितरण येथील कामगारांचा सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे संयोजन ज्ञानदीप फाउंडेशनचे अध्यक्ष श्री नामदेवराव भुरूक यांनी केले यावेळी सिद्धी पोकळे हिचा एमबीबीएस झाल्याबद्दल सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यावेळी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, श्री तानाजी कांबळे,गुलाब पोकळे रामदास कुंभार, दिलीप रायकर, दिनेश कुंभार, ॲड राजेंद्र मिन्डे ॲड राजेंद्र भुरूक,किशोर पोकळे, याचबरोबर प्रमोद रायकर, तुषार पोकळे, वस्ताद सुभाष पोकळे ,रमेश चांदेकर आदी मान्यवर उपस्थित होते ग्रामस्थ व नागरिक , मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोंढव्यात पाण्याचा प्रश्न पेटणार!

## आता भाजप कार्यकर्ते मैदानात; प्रशासनाला दिला निर्वाणीचा इशारा



**जनस्वाक्षरी मोहिमेद्वारे जनजागृती**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत असतानाच पुण्यातील कोंढवा परिसरात पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. अपुरा पाणीपुरवठा आणि कमी दाबाने येणारे पाणी यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या सोबतीला आता भारतीय जनता पक्षाचे (भाजपा) स्थानिक कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. कोंढव्यातील ही तहान मिटवण्यासाठी आता भाजपने थेट मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून कोंढवा खुर्द परिसरात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. शिवनेरी नगरला रोज फक्त पावनेदोन तास पाणी पुरवठा होत आहे.अनेक सोसायट्यांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, टँकर माफियांच्या वाढत्या मनमानीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. महापालिकेकडे वारंवार तक्रार करूनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये मोठा संताप आहे. या पार्श्वभूमीवर, भाजप कार्यकर्त्यांनी लष्कर पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्याना वारंवार तक्रारी करून सुद्धा काहीही उपयोग झाला नाही. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली. "कोंढवेकरांची तहान मिटे पर्यंत आम्ही शांत बसणार नाही," अशी भूमिका भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. यामध्ये भाजपाचे युवा नेते प्रतीक लोणकर, अमर गव्हाणे, सतिश शिंदे, सुप्रिया शिंदे, सतपाल पारगे , अक्षय शिंदे यांनी प्रशासनला कडक इशारा दिला आहे. आमदार योगेश टिळेकर यांच्या मार्गदर्शनात त्यांनी जनस्वाक्षरी अभियान सुरु आहे. या स्वाक्षरी मोहिमेला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून हजारो नागरिकांनी कोंढव्याचा पाणी प्रश्न मिटावा म्हणून नागरिक मोठ्या प्रमाणात स्वाक्षरी करत आहेत. जर येत्या काही दिवसात पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर महापालिका आयुक्तांच्या दालनासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजप कार्यकर्त्यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे कोंढव्यातील राजकारण आणि पाणी प्रश्न दोन्ही चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

"प्रशासन केवळ आश्वासने देत आहे, पण प्रत्यक्ष जमिनीवर नागरिक पाण्यासाठी वणवण करत आहेत. भाजप कार्यकर्त्यांनी आता कंबर कसली असून आम्ही हा प्रश्न मार्गी लावल्याशिवाय मागे हटणार नाही." असेही स्थानिक भाजप पदाधिकारी प्रतीक लोणकर, अमर गव्हाणे, सतिश शिंदे, सतपाल पारगे, अक्षय शिंदे, अभिषेक सोनावणे, श्रीकांत लोणकर, सनी लोणकर, रोहित देवकुळे, गणेश माळी, हर्षल गोते, व सुप्रिया शिंदे यांनी दिला आहे.

### कार्यकर्त्यांच्या प्रमुख मागण्या

- कोंढवा परिसरात पुरेसा आणि समन्यायी पाणीपुरवठा व्हावा.
- अपुरा दाबाने पाणी येणाऱ्या भागातील तांत्रिक दोष त्वरित दूर करावेत.
- टँकर माफियांच्या मनमानीवर अंकुश लावावा.
- प्रलंबित असलेल्या 'समान पाणीपुरवठा योजने'ची कामे तातडीने पूर्ण करावीत.

## "विद्यार्थी हिताय पालक सुखाय" व्याख्यानमालेचे आयोजन

- डॉ. भावेश भाटिया यांचे "रुक् जाना नहीं" प्रेरणादायी व्याख्यान १० मे रोजी पुण्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक मातृ दिनानिमित्त पुण्यातील यशवंत क्लासेसच्या वतीने "विद्यार्थी हिताय पालक सुखाय" या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेअंतर्गत जागतिक कीर्तीचे अंध उद्योजक, पॅराऑलिम्पिक गोल्ड मेडल विजेते आणि सनराईज कँडल्सचे संस्थापक डॉ. भावेश हसुमतीबेन चंदुभाई भाटिया यांचे "रुक् जाना नहीं..." हे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती यशवंत क्लासेसचे संस्थापक शीतल पाटील यांनी दिली. हा कार्यक्रम रविवार, १० मे रोजी सकाळी ८.३० वाजता अण्णाभाऊ साठे सभागृह, सातारा रोड, पुणे येथे होणार आहे. स्वतः अंध असूनही हातगाडी विक्रेत्यापासून तब्बल ३५० कोटी रुपयांची उलाढाल असलेला उद्योग उभारणाऱ्या डॉ. भावेश भाटिया यांनी आपल्या सनराईज कँडल्स या उद्योगाच्या माध्यमातून १० हजारांहून अधिक अंध, दिव्यांग आणि अनाथ व्यक्तींना स्वावलंबनाचा मार्ग दिला आहे.विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलणारे आणि पालकांना आयुष्यभराची ऊर्जा देणारे हे व्याख्यान प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांनी आवर्जून ऐकावे, असे आवाहन शीतल पाटील यांनी केले आहे.

## थेऊर फाटा येथे तिघांनी एकास मारहाण करून लुटले



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

मूळ गावी जात असताना थकवा आल्याने काही वेळ आराम करण्यासाठी थांबलेल्या तरुणाला हवेली तालुक्यातील थेऊर फाटा येथे मध्यरात्री तिन अज्ञातांनी बेदम मारहाण केली आणि त्याची दुचाकी, मोबाईल, रोख रक्कम व बॅग जबरदस्तीने लुटून नेल्याची घटना गुरुवार (७ मे) रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

या प्रकरणी अनिल सिद्धेश्वर काळे (वय २६ सध्या रा. चाकण, जामदार वस्ती, मुळ सताळा (ता. अहमदपूर, जि. लातूर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तीन अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल काळे यांनी ६ मे रोजी सायंकाळी सातच्या सुमारास चाकणहून टीव्हीएस रायडर दुचाकी क्रमांक एमएच २४ बीटी ४४९५ वरून मूळ गावी येथे निघाले होते. थकवा जाणवत असल्याने ७ मे रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ते पुणे-सोलापूर महामार्गालगत असलेल्या थेऊर फाटा परिसरातील काळभोरवाडा येथील एका मोकळ्या जागेत थोडा वेळ विश्रांतीसाठी थांबले होते. काही वेळाने तेथे काळ्या रंगाच्या ॲक्टिव्हा मोपेडवरून तिघे अज्ञात तरुण तेथे आले. "इथे का थांबला आहेस? ही थांबायची जागा आहे का?" असे म्हणत त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. काळ यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु तिघांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. त्यातील एकाने आ त्यांच्या खिशातील ओप्पो कंपनीचा मोबाईल आणि १८०० रुपये रोख रक्कम तर दुसऱ्याने हातातील बॅग आणि दुचाकीची चावी खेचून घेतली, तर तिसरा धक्काबुक्की करत धमक्या देत होता. काळे यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न करताच तिघांनी त्यांना मारहाण केली. व दुचाकीसह मोबाईल, रोख रक्कम आणि बॅग असा एकूण सुमारे ८२ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला. घटनेनंतर आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तीन अनोळखी इसमांच्या विरोधांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

## वीरांगना सिंह हिने पटकावला प्रथम उपविजेतेपदाचा मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात नुकताच भारतीय शास्त्रीय नृत्याचा भव्य सोहळा 'नृत्योत्सव २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. २६ ते २९ एप्रिलदरम्यान पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेल्या या चार दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील नृत्यप्रेमींनी सहभाग घेतला. ताल, परंपरा आणि कलात्मकतेने भरलेल्या या सोहळ्याने पुणेकरांची मनं जिंकली.

शिवांजली डान्स ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत सिनिअर, ज्युनिअर, सब-ज्युनिअर, सोलो, ड्युओ आणि ग्रुप अशा विविध गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. विशेषतः भरतनाट्यम आणि कथक या भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांनी रंगमंच उजळून निघाला. या स्पर्धेचे परीक्षण प्रख्यात शास्त्रीय नृत्यांगन आणि परीक्षक गौतम मराठे यांनी केले.

३० एप्रिल रोजी बालबंधर्व रंग मंदिर येथे स्पर्धेच्या निकालांची घोषणा करण्यात आली. यावेळी हांडेवाडी परिसरातील वीरांगना सिंह हिने ज्युनिअर सोलो भरतनाट्यम गटात प्रथम उपविजेतेपद पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. वीरांगना ही युरोस्कूल मधील इयत्ता तिसरी 'ई'ची विद्यार्थिनी असून नृत्यांअमृता अकॅडमि ऑफ परफॉरमिंग आर्टस् येथे नृत्याचे प्रशिक्षण घेत आहे.

प्रसिद्ध नृत्य प्रशिक्षिका आयुषी बालाईया यांच्या मार्गदर्शनाखाली वीरांगनाने केलेल्या सादरीकरणाने परीक्षक आणि प्रेक्षकांची मनं जिंकली. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणात भावमुद्रा, कथनशैली आणि तांत्रिक अचूकता यांचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळाला.

> गौतम मराठे म्हणाले, "अवघ्या पाच वर्षांच्या मुलांकडून इतक्या अवघड शास्त्रीय नृत्य सादरीकरण पाहून मला अतिशय आनंद झाला. इतर गटांतील स्पर्धकांनीही उत्कृष्ट कामगिरी केली, मात्र इतक्या लहान वयात भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करणारी ही प्रतिभा डोळ्यांचे पारणे फेडणारी होती." ते पुढे म्हणाले, "अशा लहान वयातील कलाकारांना आणि भारतीय शास्त्रीय नृत्यकलेला प्रोत्साहन मिळणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य वयात प्रशिक्षण मिळाल्यास ही मुले भविष्यात नृत्यक्षेत्रात मोठे यश संपादन करू शकतात." 'नृत्योत्सव २०२६' ही केवळ स्पर्धा नव्हती, तर भारतीय संस्कृती, परंपरा आणि नव्या पिढीच्या कलागुणांचा संगम ठरली. अशा उपक्रमांमुळे भारतीय शास्त्रीय नृत्य परंपरेचे जतन आणि संवर्धन होण्यास निश्चितच मोठी मदत होत आहे.

## स्वतःच्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपी बापास जन्मठेप

- अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर यांचा कठोर निर्णय

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

ओतूर ता.जुन्नर येथील नराधम बापाने स्वतःच्याच अल्पवयीन मुलीस हाताने मारहाण करून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. ही घटना दि. १९/१२/ २० रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. शाळेच्या मधल्या सुट्टीत ही नऊ वर्षाची पीडित मुलगी जेवण करण्यासाठी घरी आली होती. यावेळी घरात कोणी नसल्याची संधी साधुन तिच्या वडीलांनी घराचा दरवाजा आतून बंद केला व स्वतःच्या मुलीस हाताने मारहाण करून लैंगीक अत्याचार केला होता. हा प्रकार मुलीच्या आईला समजल्यानंतर आईने ओतूर पोलीसंकडे दि.१९/१२/२०२० रोजी तक्रार दिली होती.

त्यानुसार नराधम बापावर गु.र.नं. ४८८/२०२० भा.द.वि. का.क. ३७६ (१) (२) (आय), (जे), ३२३ सह लैंगीक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ चे कलम ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी.एच. कांबळे यांनी दाखल गुन्हयाचा तपास स्वतःकडे घेवुन आरोपी अटक केले होते. यातील आरोपीचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करून तपासी अधिकारी यांनी परिपुर्ण दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

## हायब्रिड कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी एअरटेलचे 'झिरो ट्रस्ट' समाधान लॉन्च

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

AI-आधारित सायबर हल्ल्यांचे वाढते प्रमाण आणि त्यांची गुंतागुंत लक्षात घेता, उद्योगांसमोर डेटा आणि नेटवर्क सुरक्षेचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर एअरटेल बिझनेस ने भारतातील उद्योगांसाठी 'एअरटेल सिक्युअर वर्कफोर्स' हे देशातील पहिले पूर्णतः व्यवस्थापित आणि एकात्मिक झिरो ट्रस्ट आर्किटेक्चर (ZTA) आधारित सुरक्षा समाधान सादर केले आहे. हायब्रिड वर्कफोर्ससाठी विकसित करण्यात आलेले हे समाधान वापरकर्ते, डेटा आणि उपकरणांचे कुठूनही आणि केव्हाही संरक्षण करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथे गुरुवारी या समाधानाची घोषणा करण्यात आली. AI-आधारित सायबर हल्ल्यांचा वेग आणि प्रमाण झपाट्याने वाढत असून 2025 मध्ये भारतात 20 लाखांहून अधिक सायबर सुरक्षा घटना नोंदविण्यात आल्या होत्या. या वाढत्या धोक्यांचा सामना करण्यासाठी एअरटेलने हे एंड-टू-एंड सुरक्षा व्यासपीठ विकसित केले आहे. एअरटेलच्या देशव्यापी नेटवर्क, 24x7 तज्ज्ञ देखरेख आणि राष्ट्रीय स्तरावरील सायबर सुरक्षा अनुभवाच्या आधारे हे समाधान उद्योगांना अधिक सक्षम सुरक्षा देणार आहे. तसेच स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा आणि तिचे व्यवस्थापन करण्याचा परिचालनात्मक भारही कमी होणार आहे. भारताच्या डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (DPDP) कायद्याशी सुसंगत असलेले हे समाधान वापरकर्ते, उपकरणे, नेटवर्क, ॲप्लिकेशन्स आणि डेटा यांमधील सर्व एंडपॉइंट्सचे संरक्षण करणार आहे.

## दहावीच्या बॅचचा हृदयस्पर्शी स्नेहमेळावा संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाळेच्या आठवणी म्हणजे आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर पानं... आणि तीच पानं पुन्हा एकदा जिवंत झाली, जेव्हा यशवंत विद्यालय, खडकवासला येथील १९९४ च्या दहावीच्या बॅचने तब्बल ३२ वर्षांनंतर स्नेहमेळाव्याचे आयोजन केले. जुन्या मित्रमैत्रिणींची भेट, आठवणींचा वर्षाव आणि भावनांचा ओलावा यामुळे हा मेळावा प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरला.

रविवारी (३ मे २०२६) पुण्यातील नांदेड सिटी येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य पुनर्मिलन सोहळ्यात तब्बल ८५ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. काही जण परदेशातून तर काही दूरवरच्या शहरांतून खास या भेटीसाठी आले होते. अनेक वर्षांनी भेटलेल्या मित्रांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते, तर चेहऱ्यावर जुन्या आठवणींचं निरागस हास्य झळकत होतं. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता शाळेच्या प्रार्थनेने झाली. प्रार्थनेचे सूर कानावर पडताच उपस्थित सर्वजण थेट शालेय जीवनात पोहोचल्याचा अनुभव घेत होते. त्यानंतर "आठवणींचा गेम" खेळण्यात आला. जुन्या फोटोंमधून मित्रमैत्रिणींना ओळखण्याचा प्रयत्न करताना हास्याचे फवारे उडाले. शाळेतील खोड्या, वर्गातील गंमतीजमती, शिक्षकांचे किस्से आणि मधल्या सुट्टीतील आठवणींनी वातावरण भारावून गेले. "३२ वर्षांनंतरही आपण एकमेकांना तितक्याच प्रेमाने भेटतोय, हीच खरी शाळेची कमाई आहे," अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. "शाळा ही फक्त शिक्षण देणारी संस्था नसते, तर आयुष्यभर जपली जाणारी मैत्री निर्माण करणारे मंदिर असते," अशा भावना व्यक्त होताच अनेकांच्या डोळ्यांत नकळत पाणी आले. या मेळाव्यात अनेकांनी आपल्या आयुष्याचा प्रवास सांगितला. डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, उद्योजक, बँकर अशा विविध क्षेत्रांत यश मिळवलेल्या मित्रांनी संघर्ष आणि यशाच्या कथा शेअर करत एकमेकांना प्रेरणा दिली. अनेक वर्षांनी भेटूनही नात्यांतील आपुलकी तशीच कायम असल्याचे चित्र पाहायला मिळाले. दुपारच्या जेवणानंतर संगीत खुर्ची, गाण्यांची मैफिल, नृत्य, काव्यवाचन आणि शाळेतील शिक्षकांच्या आठवणींवर आधारित स्टँडअप कॉमेडीने कार्यक्रमात रंगत आणली. जुन्या हिंदी-मराठी गाण्यांवर अनेकांनी मनमुराद ठेका धरला. काही क्षण असे होते की, उपस्थित प्रत्येक जण पुन्हा एकदा शाळकरी मुलगा-मुलगी बनून गेला होता. कार्यक्रमाच्या शेवटी पुढील स्नेहमेळावा वर्षभरात पुन्हा आयोजित करण्याचा निर्धार करण्यात आला. सामूहिक फोटोसेशन करताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि मनात पुन्हा भेटण्याची ओढ स्पष्ट दिसत होती. हा स्नेहमेळावा केवळ जुन्या मित्रांच्या भेटीगाठींचा कार्यक्रम नव्हता, तर एका पिढीच्या मैत्रीचा, जिव्हाळ्याचा आणि शालेय आठवणींचा भावनिक आनंद उत्सव ठरला.




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

शनिवार, दि. ९ मे २०२६






# धायरी शिवणे भाजपा मंडल कार्यकारणी बैठक संपन्न

## निवडणुका नाहीत मात्र पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी पुणे शहराच्या वतीने नुकतीच विविध मंडलांमध्ये प्रभारी पदांवर वरिष्ठ व अनुभवी कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत धायरी-शिवणे मंडल प्रभारीपदी भाजपचे सक्रिय कार्यकर्ते गणेश कळमकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



या पार्श्वभूमीवर धायरी-शिवणे मंडलाची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत मंडलातील पदाधिकारी, बूथ प्रमुख व कार्यकर्त्यांशी संवाद साधत आगामी संघटनात्मक नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना गणेश कळमकर म्हणाले की, “सध्या कोणत्याही निवडणुका तातडीने नसल्यामुळे हा कालावधी संघटन अधिक मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणारे लोकहिताचे आणि जनकल्याणकारी निर्णय समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे, हेच आपले प्रमुख उद्दिष्ट आहे.”

तसेच बैठकीत SIR उपक्रम, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘मन की बात’ कार्यक्रमाचे व्यापक जनजागरण तसेच पदवीधर मतदार नोंदणी अभियानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बूथ स्तरावरील कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन व नियोजन करण्यात आले.

या बैठकीस मंडल अध्यक्ष विजयजी मते, नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे, महिला मोर्चा मंडलाध्यक्ष मनीषाताई मोरे, पुणे शहर महिला मोर्चा सरचिटणीस रोहिणी राहणे, ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, पुणे शहर उपाध्यक्ष ओबीसी मोर्चा रमेशबापू गायकवाड, प्रभाग अध्यक्ष सचिन दांगट,अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष प्रकाशभाऊ साळवे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते ,नरसिंग लगड, अनिलभाऊ पोकळे, किरण हगवणे, भगवान मोरे तसेच बूथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> भारतीय जनता पार्टी च्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित केली. सर्व कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या संघटनात्मक कार्यामध्ये योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.
> **- विजय मते, मंडलाध्यक्ष, भाजपा धायरी शिवणे मंडल**



## महालक्ष्मी सरसमध्ये जागतिक दर्जाच्या थीम पॅव्हेलियनची भव्य मांडणी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महालक्ष्मी सरस २०२६ यंदा आपल्या भव्य थीम पॅव्हेलियन, आकर्षक सजावट आणि जागतिक दर्जाच्या संकल्पनेमुळे विशेष चर्चेत आले आहे. महाराष्ट्राची संस्कृती, ग्रामीण जीवन, महिला सक्षमीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम यंदाच्या पॅव्हेलियनमध्ये पाहायला मिळत आहे. यंदाची मुख्य थीम महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाला समर्पित करण्यात आली आहे. स्त्रीशिक्षण, सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणप्रसारासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाला अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले आहे. मुख्य प्रवेशद्वार, बाह्य सजावट, मुख्य मंच आणि विविध भागांमध्ये फुले दांपत्यांचे विचार आणि कार्य प्रभावी दृश्यरूपातून साकारण्यात आले आहे. यंदाच्या सरसमधील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे सुमारे ४० मीटर लांब आणि ७ मीटर उंचीचा भव्य त्रिमितीय एलईडी पडदा.

## भाजपा ओबीसी मोर्चा सरचिटणीसपदी रमेशबापू गायकवाड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी मोर्चा पुणे शहर सरचिटणीसपदी रमेशबापू गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सातत्याने सक्रिय सहभाग, कार्यकर्त्यांशी असलेला जवळचा संपर्क आणि विविध उपक्रमांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. भाजपा पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुणे शहराध्यक्ष विकास लवटे यांनी नियुक्तीपत्र देत ही घोषणा केली. यापूर्वी रमेश गायकवाड हे पुणे शहर ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आणि पक्षनिष्ठेमुळे त्यांना ही बढती मिळाल्याचे बोलले जात आहे. नियुक्तीपत्रात गायकवाड यांच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनुभवाचा उल्लेख करण्यात आला असून,



> रमेश गायकवाड यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल आभार मानत, “भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांसाठी आपण पूर्ण क्षमतेने कार्यरत राहू,” अशी भावना व्यक्त केली.

पुणे शहरात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. राष्ट्र प्रथम या भावनेतून भारतीय जनता पार्टीचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून पक्षाच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करतील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. रमेशबापू गायकवाड हे भारतीय जनता पार्टीच्या विविध संघटनात्मक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे कार्यरत असून, अनेक कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यांच्या निवडीबद्दल प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चा अध्यक्ष आमदार योगेश टिळेकर, खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे तसेच विविध पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी बोलताना ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष विकास लवटे यांनी, “रमेश गायकवाड यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा पक्षाला निश्चितच मोठा फायदा होईल,” असा विश्वास व्यक्त केला.

# मराठी अस्मितेचा भावनिक सोहळा

## ‘राजा शिवाजी’ चित्रपटाला ‘श्रीमान लेजंड’ यांची अनोखी मानवंदना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक चित्रपट दिग्दर्शक रितेश देशमुख यांच्या दिग्दर्शनातून १ मे अर्थात महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीला आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणापासून अफजलखान वधापर्यंतचा प्रेरणादायी इतिहास या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर प्रभावी आणि भावनिक पद्धतीने साकारण्यात आला आहे. चित्रपटात स्वतः रितेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली असून महाराणी सईबाईंच्या भूमिकेत जेनेलिया देशमुख दिसून येतात. या चित्रपटात अनेक मराठी तसेच हिंदी कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. महाराष्ट्रासह देशभरातील विविध भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, शिवचरित्र नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात हा चित्रपट यशस्वी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.



या कारणाचे औचित्य साधत गेमिंग विश्वात मराठमोळा 'श्रीमान लेजंड' या नावाने ओळखले जाणारे लोकप्रिय क्रिएटर सिद्धांत प्रवीण जोशी यांनी या चित्रपटासाठी एक विशेष स्क्रीनिंग आयोजित करत मराठी संस्कृतीप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा दाखवून दिली. बुधवार दि. ६ मे २०२६ रोजी नवी मुंबई येथील सीवूड्स नेक्सस मॉलमधील संपूर्ण थिएटर स्वतःच्या खर्चाने बुक करून त्यांनी आपल्या चाहत्यांना ‘राजा शिवाजी’ चित्रपट पाहण्यासाठी निमंत्रित केले. हा केवळ चित्रपट पाहण्याचा कार्यक्रम नव्हता, तर मराठी भाषा, इतिहास आणि संस्कृती यांना नव्या पिढीशी जोडणारा एक भावनिक सोहळा होता. या विशेष स्क्रीनिंगसाठी भारतातील प्रसिद्ध गेमिंग क्रिएटर 'स्नॅक्स गेमिंग' आणि इतर

**शब्दांकन : मा. श्री. प्रितेश माने**

मोठे क्रिएटर देखील या विशेष स्क्रीनिंगला उपस्थित होते. त्यामुळे गेमिंग विश्वातील अनेक चाहत्यांसाठी हा क्षण अधिक खास ठरला. महाराष्ट्रातील विविध भागांतून चाहते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. अनेक चाहत्यांनी आपल्या परिवारासह या कार्यक्रमात सहभाग घेतला. श्रीमान लेजंड यांनी आपल्या सुरक्षेसाठी असलेल्या अंगरक्षकांनादेखील इतर प्रेक्षकांसोबत बसवून चित्रपट पाहण्याची संधी दिली. प्रत्येकाला समानतेने सोबत घेऊन इतिहास अनुभवण्याचा हा क्षण अनेकांच्या मनाला स्पर्शून गेला. विशेष करून कार्यक्रमासाठी आलेल्या प्रत्येक चाहत्याला ‘बांधिलकी’ नावाचे विशेष टी-शर्ट भेट म्हणून देण्यात आले. तसेच चित्रपटादरम्यान खाद्यपदार्थांची मोफत व्यवस्था करण्यात आली होती.

चित्रपट मराठी भाषेत पाहिला गेला, तरी अनेक हिंदी भाषिक चाहतेदेखील हा अनुभव घेण्यासाठी उपस्थित होते. त्यांना चित्रपटातील संवाद, प्रसंग आणि इतिहास समजावून सांगण्यासाठी मराठी भाषिक चाहते पुढे आले. भाषेच्या मर्यादा ओलांडून मराठी संस्कृती आणि शिवचरित्र सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न उपस्थितांच्या मनात विशेष ठसा उमटवून गेला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अभिजित भोंडे आणि त्यांच्या सहकारी मित्रांच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच संपूर्ण इव्हेंटचे व्यवस्थापन, प्रेक्षकांची व्यवस्था, थिएटरमधील नियोजन आणि कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी 'पीएम प्रोडक्शन' टीमने विशेष मेहनत घेतली. प्रत्येक गोष्ट अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडल्याने उपस्थित चाहत्यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.



चित्रपट संपल्यानंतर संपूर्ण थिएटरमध्ये “जय भवानी, जय शिवाजी”च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. अनेकांच्या डोळ्यांत भावुकता होती, तर अनेकांच्या चेहऱ्यावर मराठी इतिहासाचा अभिमान झळकत होता. आपल्या चाहत्यांसोबत, मित्रांसोबत आणि परिवारासोबत बसून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अनुभवणारा हा क्षण श्रीमान लेजंड यांच्यासाठीही विशेष ठरला. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता तो नव्या पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे, महाराजांचे विचार आणि स्वराज्याची प्रेरणा प्रत्येक तरुणाला समजली पाहिजे, या उद्देशाने श्रीमान लेजंड यांनी हा विशेष उपक्रम राबवला. त्यांच्या या प्रयत्नामुळे अनेक हिंदीभाषी चाहत्यांना मराठी संस्कृती आणि शिवचरित्राची नव्याने ओळख झाली, तर मराठी तरुणांमध्ये इतिहासाबद्दलचा अभिमान अधिक वाढला. मराठी भाषा, संस्कृती आणि शिवचरित्र यांची जपणूक करण्याचा संदेश देणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची ॲड. जगताप यांनी घेतली भेट

पुणे (आरंभ पर्व) : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची नुकतीच शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी माजी उपमहापौर, नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी अण्णांच्या प्रकृतीची आस्थेवाईक चौकशी करत त्यांना उत्तम आरोग्य लाभावे तसेच निरोगी आणि दीर्घायुष्य लाभो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शस्त्रक्रियेनंतरही मुरलीधर मोहोळ यांनी दाखविलेला सकारात्मक दृष्टिकोन आणि कार्यतत्परता प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी ॲड.प्रसन्नदादा जगताप यांच्या पत्नी सौ. वृंदाताई जगताप हेदेखील उपस्थित होत्या. अत्यंत आत्मीयतेच्या वातावरणात झालेल्या या भेटीत आपुलकी आणि शुभेच्छांचा भाव दिसून आला. मोहोळ यांच्या लवकर प्रकृती सुधारण्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### यश मिळवण्यासाठी ज्ञान, चिकाटी आणि योग्य प्लॅटफॉर्मची गरज



पुणे (आरंभ पर्व) : आर्थिक सेवा क्षेत्रातील कारकीर्द अनेकदा एका संधीने सुरू होते; परंतु दीर्घकालीन यश हे ज्ञान, चिकाटी आणि योग्य प्लॅटफॉर्मच्या जोरावरच मिळते. पुणेस्थित वित्तीय सल्लागार रमेश चव्हाण यांचा ‘एलआयसी’ एजंट ते १२० कोटी रुपयांहून अधिक ‘ॲसेट अंडर मॅनेजमेंट’ उभारण्यापर्यंतचा प्रवास नेमका हेच दर्शवतो. चव्हाण यांनी १९९७ मध्ये पुण्यात ‘एलआयसी’ एजंट म्हणून आपल्या व्यावसायिक प्रवासाला सुरुवात केली. त्यांचा विमा क्षेत्रातील प्रवेश अनियोजित होता, तरीही यामुळे त्यांना ग्राहक संबंध आणि आर्थिक सेवांचा मौल्यवान अनुभव मिळाला. सन २००८ मध्ये त्यांची ओळख म्युच्युअल फंड आणि ‘एनजे वेल्थ’ प्लॅटफॉर्मशी झाली. मात्र, त्याच वर्षी आलेल्या जागतिक आर्थिक मंदीचा त्यांच्या सुरुवातीच्या पोर्टफोलिओवर मोठा परिणाम झाला. त्यामुळे त्यांनी काही काळ यातून माघार घेतली. सन २०१२मध्ये त्यांच्या आयुष्यात एक महत्त्वाचे वळण आले; जेव्हा त्यांनी ‘सर्टिफाइड फायनान्शियल प्लॅनर’चा कोर्स पूर्ण केला. यामुळे त्यांची ‘ॲसेट ॲलोकेशन’ आणि दीर्घकालीन गुंतवणुकीबद्दलची समज अधिक प्रगल्भ झाली. नवीन आत्मविश्वासासह त्यांनी सन २०१३ मध्ये पुन्हा ‘एनजे वेल्थ’मध्ये प्रवेश केला. त्यावेळी त्यांनी सुमारे ६५ लाख रुपये ‘एयूएम’ आणि २.५ लाखांच्या ‘एसआयपी’ बुकसह नव्याने सुरुवात केली. गेल्या काही वर्षांत, शिस्तबद्ध आर्थिक मूल्यांकन आणि भक्कम ग्राहक संबंधांच्या जोरावर त्यांच्या व्यवसायात सातत्याने वाढ झाली आहे. आज ते सुमारे १२० कोटी रुपयांचे ‘एयूएम’ आणि जवळपास ८० लाख रुपयांचे ‘एसआयपी’ बुक सांभाळत असून, ४००-४५० कुटुंबांना (सुमारे ७०० ग्राहक) सेवा देत आहेत. त्यांचे बहुतांश ग्राहक पुण्यात असले, तरी रेफरल्समुळे दिल्ली, नोएडा, चंदीगड आणि बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्येही त्यांचा विस्तार झाला आहे. ‘एनजे वेल्थ’चे तंत्रज्ञान आणि कार्यप्रणालीच्या पाठिंब्यामुळे ते आपल्या व्यवसायाचा विस्तार करत असून, येणाऱ्या काही वर्षांत ५०० कोटी रुपयांचे ‘एयूएम’ गाठण्याचे त्यांचे ध्येय आहे.



### भोंदू महाराजांच्या चरणी सुशिक्षितांचे लोटांगण हे महाराष्ट्राचे दुर्दैव : सबनीस

पुणे (आरंभ पर्व) : "छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेल्या, शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर चालणाऱ्या महाराष्ट्रात सुशिक्षित लोक आणि राजकारणी मंडळी भोंदू महाराजांच्या चरणी लोटांगण घालतात, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. शिवाजी महाराजांच्या इतिहासाची मोडतोड करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या, अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या आणि माताभगिनींचा अवमान करणाऱ्या प्रवृत्ती ठेचायला हव्यात, छत्रपती शिवाजी महाराजांसारखा न्यायनिवाडा व्हायला हवा," अशी परखड भूमिका माजी संमेलनाध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी मांडली. स्नेहशील फाउंडेशनच्या वतीने आयोजित पहिल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कार्यप्रेरणा पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. सबनीस बोलत होते. इतिहास अभ्यासक डॉ. श्रीमंत कोकाटे, सामाजिक भान जपणारी अभिनेत्री प्राजक्ता हनमघर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लहुजी समता परिषदेचे अनिल हातागळे, 'शिवाजी कोण होता?'चे प्रकाशक प्रशांत आंबी, बालप्रबोधनकार स्वरा सुतकर यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. नवी पेठेतील पत्रकारभवनात झालेल्या या पुरस्कार सोहळ्यात ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण, ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपक केदार, संयोजिका व स्नेहशील फाउंडेशनच्या संस्थापिका स्नेहा कांबळे-माने आदी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### १८ लाखांचा मुद्देमाल मालकांना परत

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : नागरिकांचा चोरुन नेलेला किंमती ऐवज तसेच हरवलेले व गहाळ झालेले मोबाईल तसेच विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला सुमारे १८ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल मूळ मालकांना परत करून लोणी काळभोर पोलीस ठाणे यांनी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ केला आहे. आपला ऐवज परत मिळाला यांमुळे अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला तर काहींच्या डोळ्यांत आनंदाश्रूही तरळले. लोणी काळभोर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या हस्ते गुरुवारी (७ मे) रोजी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात मुद्देमाल वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे (लोणी काळभोर), अमोल मोरे (फुरसुंगी), बाबासाहेब निकम (मांजरी), पोलीस हवालदार, रवी आहेर, संदीप जोगदंड, बापू वाघमोडे, पोलिस अंमलदार योगेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तंत्रज्ञानाधारित उद्योगांची गरज



पुणे/पिंपरी (आरंभ पर्व) : "देशाच्या विकास प्रक्रियेत महत्वाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योगांना सुयोग्य पद्धतीने कार्यान्वित करण्यासाठी, तसेच विकासाला गती देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. एआय, डिजिटायझेशन यामुळे उद्योगांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल," असे प्रतिपादन दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अर्थात डिक्कीचे संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी केले. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळेच २०४७ पर्यंत भारताची विकसनशील देश ही ओळख पुसून विकसित देश अशी ओळख निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले. पिंपरी-चिंचवड येथील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये एक्स्पोनॉमिक्स इव्हेंट्सच्या वतीने आयोजित भारतातील पहिल्या 'ईआरपी' औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन मिलिंद कांबळे बोलत होते. प्रसंगी संयोजक 'एक्स्पोनॉमिक्स'चे संचालक सागर अहिवळे व मिलिंद हडप, आरती भोसले-अहिवळे, सनवन टेक्नॉलॉजीच्या संचालक श्रद्धा कुलकर्णी, अप्लिका कन्सल्टन्सीचे प्रमुख रॉड अल्बुकर्क, रिंगफिडर ट्रान्समिशनचे सीईओ दीपान रामलिंगम, इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र फणसे, रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईटचे इरफान आवटे, प्रसाद कुलकर्णी, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सीईओ दिलीप बटवाल, डॉ. प्रकाश मुंडे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ध्वनिचित्रफितीद्वारे प्रदर्शनाचे कौतुक केले. यावेळी प्रदर्शनाविषयी माहिती असलेल्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या तीन दिवसांच्या प्रदर्शनात उत्पादन, वित्त, लॉजिस्टिक्स, रिटेल, हेल्थकेअर, कन्स्ट्रक्शन आणि एडटेक या क्षेत्रांतील अत्याधुनिक ईआरपी आणि डिजिटल सोल्युशन्स सादर होणार आहेत. तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचा अनुभव घेता येणार आहे. हे प्रदर्शन येत्या शनिवारपर्यंत (ता. ९) सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.



### राहुल चाबुकस्वार यांना राज्यस्तरीय सरपंच परिषदेचा पुरस्कार प्रधान

दौंड (आरंभ पर्व) : अखिल भारतीय सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा आजी माजी सरपंच व उपसरपंच पुरस्कार यावर्षी कानगाव तालुका दौंड या गावचे सरपंच तसेच दौंड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल चाबुकस्वार त्यांना प्रदान करण्यात आला, पाचगणी महाबळेश्वर येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष हुकुमचंद आमदेश शिव व्याख्याते संभाजी मोहिते तसेच महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, गेल्या अनेक वर्षापासून राहुल चाबुकस्वार हे कानगाव पंचक्रोशी तसेच तालुक्यामध्ये राजकीय सामाजिक दृष्टिकोनातून अनेक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेत आलेले आहेत ते सध्या कानगाव गावचे सरपंच असून दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक आहेत त्यांच्या कार्याचे दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय सरपंच परिषदेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला, हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आल्याने कानगाव गावासह तालुक्यातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

### ह्युंदाई मोटरला भारतात 30 वर्षे पूर्ण

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि. (एचएमआयएल) ने भारतात 30 वा स्थापना दिवस आज साजरा केला असून भारतात आद्यप्रवर्तक स्मार्ट मोबिलिटी सोल्युशन्सची तीन दशके पूर्ण केली आहेत.6 मे 1996 रोजी प्रस्थापित झालेली एचएमआयएल भारतातील सर्वात विश्वासार्ह व लोकप्रिय वाहन ब्रँडसपैकी एक म्हणून विकसित झाली आहे. ह्युंदाईच्या जागतिक प्रवासात भारत हे केंद्रस्थानी राहिले आहे.एचएमआयएल ने कामकाज विस्तार,जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि स्थानिक प्रतिभेला चालना देण्यासाठी 40,700 कोटी रूपयांची गुंतवणूक केली आहे. ह्युंदाईचा भारतातील प्रवास 6 मे 1996 रोजी तमिळनाडूमधील श्रीपेरंबुदुर येथील अद्ययावत उत्पादन प्रकल्पाने झाला.1998 पासून कार्यरत असलेला हा प्रकल्प ह्युंदाईचा कोरिया व्यतिरिक्त पहिला एकात्मिक कार उत्पादन प्रकल्प आहे.

# महाराष्ट्रात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर भर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रे निओ फार्मा या नेक्स्ट-जनरेशन फार्मास्युटिकल कंपनीने पुण्यात आपल्या कामकाजाचा अधिकृत शुभारंभ केला आहे, ज्यासह महाराष्ट्रात दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रवासामध्ये आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पुण्यातील एका पत्रकार परिषदेत या घोषणेसोबत कंपनीच्या नेतृत्व टीमने आपली दूरदृष्टी, विकास आराखडा आणि रुग्ण-केंद्रित आरोग्यसेवा वितरणाबद्दलची कटिबद्धता स्पष्ट केली.



> अंगभूत क्षमता आणि धोरणात्मक उत्पादन भागीदारी यांचे संयोजन असणाऱ्या स्थिर कार्यप्रणालीसह रे निओ फार्मा गुणवत्ता आणि नियमांचे उच्च निकष राखून कार्यक्षमतेने विस्तार करण्यास सज्ज आहे. संशोधन, सुशासन आणि रुग्ण-प्रथम या तत्त्वांवर दिलेला प्रबळ भर पाहता ही कंपनी संपूर्ण क्षेत्रातील आरोग्यसेवा प्रदात्यांसाठी विश्वसनीय भागीदार म्हणून उदयास येण्यास सज्ज आहे. पुण्यापासून आपल्या प्रवासाची सुरुवात करताना रे निओ फार्माचा महाराष्ट्रातील आरोग्यसेवा क्षेत्रात मोलाचे योगदान देण्याचा मनसुबा आहे. औषधांची उपलब्धता अधिक सहजसाध्य करणे, उपचारांचे उत्तम परिणाम मिळवून देणे आणि दीर्घकालीन व शाश्वत वाढीसाठी प्रबळ पाया रचणे यावर कंपनीचा भर आहे.

आपल्या महाराष्ट्राप्रती धोरणामध्ये पुण्याला केंद्रस्थानी ठेवून रे निओ फार्माचा शहरातील आघाडीचे हॉस्पिटल्स, वैद्यकीय व्यावसायिक आणि संशोधन संस्थांच्या प्रबळ परिसंस्थेचा लाभ घेण्याचा मनसुबा आहे. भारतातील सर्वात प्रगतीशील आरोग्य आणि शिक्षण केंद्रांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर कंपनीला सखोल भागीदारी निर्माण करण्यासाठी आणि राज्यातील शहरी व अर्ध-शहरी बाजारपेठांमध्ये आपला विस्तार करण्यासाठी प्रबळ पाया उपलब्ध करून देते. रे निओ फार्मा ॲक्युट (तात्काळ उपचार लागणारे आजार) आणि क्रॉनिक (दीर्घकालीन आजार) उपचारांशी संबंधित 90 पेक्षा जास्त फॉर्म्युलेशनचा (औषध रचना) पोर्टफोलिओ सादर करत आहे, तसेच प्रगत उपचारांच्या अनेक उत्पादनांवर सध्या काम सुरू आहे. महाराष्ट्रात, कंपनी आपले वितरण जाळे सक्रियपणे प्रबळ करत आहे. डॉक्टर, आरोग्यसेवा प्रदाता आणि चॅनेल पार्टनर्ससोबत धोरणात्मक सहयोग प्रस्थापित करत आहे, ज्यामुळे रुग्णांना शेवटच्या टप्प्यापर्यंत औषधे उपलब्ध होतील आणि आरोग्यासाठी उत्तम परिणाम मिळतील. उद्योजक अमित पटनी यांनी स्थापन केलेली रे निओ फार्मा तंत्रज्ञान, उत्पादन, आरोग्यसेवा पायाभूत सुविधा आणि फायनान्स यांसारख्या विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट व्यवसायाचा वारसा एकत्र आणते. हे बहुक्षेत्रीय नैपुण्य कंपनीला आधुनिक, चपळ आणि नैतिक मूल्यांवर आधारित औषध निर्माण व्यवसाय उभारण्यासाठी प्रबळ आधार देते. कंपनीचा पोर्टफोलिओ उपचारांच्या विस्तृत क्षेत्रांच्या गरजांची पूर्तता करतो, ज्यामध्ये अँटीबायोटिक्स, मधुमेह विरोधी काळजी, पचनसंस्थेशी संबंधित उपचार, वेदना व ऑर्थोपेडिक व्यवस्थापन, श्वसन व एलर्जीसंबंधित काळजी, हृदयविकार उपचार आणि डर्माटोलॉजी यांचा समावेश आहे. उच्च-दर्जाच्या ब्रँडेड जेनेरिक्सवर लक्ष केंद्रित करून रे निओ फार्मा रुग्णांच्या बदलत्या गरजांनुसार सुरक्षित, प्रभावी आणि सुलभ उपचार उपाय प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे.

"पुणे आमच्यासाठी धोरणात्मक आणि अर्थपूर्ण आद्य बिंदू आहे. या शहरातील प्रगत आरोग्यसेवा परिसंस्था आणि येथील वैद्यकीय व्यावसायिक व संस्थांचे मजबूत जाळे दीर्घकालीन प्रभाव निर्माण करण्यासाठी या शहराला आदर्श बाजारपेठ बनवते. रे निओ फार्मामध्ये आम्ही आरोग्यसेवेकडे समाजाप्रती असलेली जबाबदारी म्हणून पाहतो. आम्ही महाराष्ट्रात भागधारकांसोबत मिळून काम करण्यावर लक्ष केंद्रित कले आहे, ज्यामुळे औषधे अधिक प्रमाणात उपलब्ध होतील, विश्वास अधिक दृढ होईल आणि रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारी दर्जेदार औषधे आम्ही पोहोचवू शकू," असे रे निओ फार्माचे संस्थापक अमित पटनी म्हणाले.

महाराष्ट्राव्यतिरिक्त रे निओ फार्माची उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि दिल्ली-एनसीआर यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्येही उपस्थिती वाढत आहे, ज्याद्वारे कंपनी भारतातील अधिकाधिक व्यक्तींपर्यंत पोहोचत आहे.

असे असले तरी, कंपनीचे तात्काळ लक्ष महाराष्ट्रातील आपला सहभाग अधिक सखोल करण्यावर आहे, जेथे प्रादेशिक वाढीला गती देण्यासाठी पुणे शहराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

# विवो X300 FE चे भारतात अनावरण

- ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन 2 आणि स्नॅपड्रॅगन 8 जेन 5 सह दमदार एंट्री

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

Vivo ने आपल्या कॉम्पॅक्ट फ्लॅगशिप स्मार्टफोन मालिकेत नवीन भर घालत Vivo X300 FE हा स्मार्टफोन भारतात सादर केला आहे. प्रगत ZEISS इमेजिंग, शक्तिशाली Snapdragon 8 Gen 5 प्रोसेसर आणि आकर्षक कॉम्पॅक्ट डिझाइन यामुळे हा स्मार्टफोन प्रीमियम श्रेणीत चर्चेचा विषय ठरत आहे.




१६.०४ सेमी (६.३१-इंच) फ्लॅट डिस्प्ले, ५००० निट्स ब्राइटनेस आणि ZEISS मास्टर कलर डिस्प्ले यामुळे या श्रेणीतील भारतातील सर्वात तेजस्वी स्क्रीन असल्याचा दावा कंपनीने केला आहे. हलक्या आणि स्लिम डिझाइनसह एका हाताने सहज वापरता येईल, अशा पद्धतीने या स्मार्टफोनची रचना करण्यात आली आहे. फोटोग्राफीसाठी या स्मार्टफोनमध्ये प्रगत ZEISS इमेजिंग तंत्रज्ञान देण्यात आले आहे. यात ५० मेगापिक्सेलचा ZEISS मुख्य कॅमेरा, ZEISS मल्टीफोकल पोर्ट्रेट सपोर्ट, १००x डिजिटल झूमसह ५० मेगापिक्सेलचा ZEISS सुपर टेलीफोटो कॅमेरा आणि AI क्रिएटिव्ह सूटचा समावेश आहे. विशेष म्हणजे, २०० मिमी समतुल्य फोकल लेंथ देणारा ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन २ देखील उपलब्ध करण्यात आला आहे. परफॉर्मन्ससाठी Snapdragon 8 Gen 5 प्रोसेसर देण्यात आला असून, ६५०० mAh क्षमतेची मोठी बॅटरी ९०W वायर्ड फ्लॅशचार्ज आणि ४०W वायरलेस फ्लॅशचार्जला सपोर्ट करते.

Vivo X300 FE हा स्मार्टफोन Urban Olive, Lilac Purple आणि Noir Black या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे. Vivo X300 FE च्या १२GB + २५६GB व्हेरिएंटची किंमत ७९,९९९ रुपये, तर १२GB + ५१२GB व्हेरिएंटची किंमत ८९,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. याशिवाय, Vivo ZEISS टेलीफोटो एक्सटेंडर जेन २ ची किंमत १५,९९९ रुपये असून, ॲक्सेसरी किटची किंमत ३,९९९ रुपये आहे.

हा स्मार्टफोन १४ मे २०२६ पासून Flipkart, Amazon India, Vivo India ई-स्टोअर तसेच देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध होणार आहे.

कंपनीकडून निवडक बँक कार्डांवर १० टक्के इन्स्टंट कॅशबॅक, २४ महिन्यांचा नो-कॉस्ट EMI, झिरो डाउन पेमेंट सुविधा, ५,००० रुपयांपर्यंत अपग्रेड बोनस, एक वर्षाची मोफत विस्तारित वॉरंटी आणि जिओकडून ५०००GB डेटा लाभ देण्यात येत आहे. याशिवाय, 'V Shield' वर ६० टक्के सूट आणि ७० टक्क्यांपर्यंत खात्रीशीर बायबॅकची सुविधाही ग्राहकांना मिळणार आहे. Vivo इंडियाचे एक्स सिरीज प्रॉडक्ट मॅनेजमेंट प्रमुख Vikas Tagra यांनी सांगितले की, "आजचे ग्राहक उत्कृष्ट परफॉर्मन्ससोबत स्टायलिश आणि सहज वापरता येईल असा स्मार्टफोन शोधत आहेत. Vivo X300 FE मध्ये आधुनिक डिझाइन, प्रगत ZEISS इमेजिंग आणि फ्लॅगशिप परफॉर्मन्सचा उत्कृष्ट मिलाफ करण्यात आला आहे."

## उरुळी कांचनमध्ये पाणीपुरवठ्यावरून संताप

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक ३ मधील गोळेवस्ती परिसरात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांचा संताप आता उफाळून आला आहे. मागील तब्बल दोन महिन्यांपासून या भागात पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात ग्रामस्थांनी थेट आंदोलनाचा इशारा देत परिस्थिती तापवली आहे. दिगंबर निवृत्ती मोहिते, आबासाहेब दशरथ चव्हाण, अशोक दिलीप चव्हाण, प्रथम सोमनाथ गायकवाड, निहाल संजय कदम, धनराज संतोष जाधव आणि ऋषिकेश भारत चांदणे या नागरिकांनी ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज सादर करून संतप्त भूमिका मांडली आहे. "ग्रामपंचायतीमार्फत पाणीपुरवठा होत असताना अचानक दोन



महिन्यांपासून तो पूर्णपणे बंद आहे. पाणीपुरवठ्याची विहीर कोरडी पडली आहे. नागरिकांना दररोज पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे," असे अर्जात नमूद करण्यात आले आहे. गोळेवस्तीतील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. "सरासरी एका कुटुंबाला किमान एक टँकर पाणी आवश्यक असताना आम्हाला थेंबथेंब पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

## एनसीएमसी कार्डची जादा दराने विक्री केल्यास परवाना रद्द होणार : मंत्री प्रताप सरनाईक

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांना एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबीलीटी कार्ड ) या स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्डची विक्री केल्यास संबंधीत विक्रेत्यांवर महामंडळाकडून कारवाई केली जाणार आहे. अशी माहिती येथील राजगुरूनगर एसटी आगाराच्या आगारव्यवस्थापक उज्वला कुटे यांनी दिली.

एनसीएमसीसाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नेमणूक करण्यात आली असून, प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवीन एनसीएमसी कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्डची विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहिती कुटे यांनी दिली.

## एशियन पेंट्सद्वारा सादर त्यांची नवीन कॉर्पोरेट मोहीम- 'रंगांची वॉरंटी'

### रंग घरांची ओळख कसे बनतात हे अधोरेखित करते

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात, पत्ते आणि दिशा म्हणजे केवळ रस्त्यांची नावे किंवा पिन कोडच नाहीत. तर ते अनेकदा 'निळ्या घरा नंतर डावीकडे वळा' किंवा 'ते लाल घर जिथे प्रत्येक सणासुदीला पाहुणे येतात' अशा आठवणींना उजाळा देतात. ज्या देशात रंग सर्वत्र सर्वव्यापी आहे, तिथे घरे म्हणजे केवळ रंगवलेल्या भिंती नाहीत, तर ती सुपरिचित चिन्हे बनतात, ज्यांना लोक ओळखतात आणि त्यांच्याशी नाते जोडतात.

'रंग म्हणजेच खरा पत्ता' या कल्पनेच्या आधारे, एशियन पेंट्स आपली नवीन मोहीम 'रंगांची




वॉरंटी' सादर करत आहेत, जी गेल्या वर्षी 'एशियन पेंट्सची वॉरंटी असे भारतातील प्रत्येक दुसरे घर सांगते' या मोहिमेद्वारे सुरू केलेला संवाद पुढे नेते.

एका उबदार, भावनिक गाण्यावर आधारित हा चित्रपट, एशियन पेंट्सने रंगवलेली भारतीय घरे दैनंदिन जीवनाचा आणि आठवणींचा भाग कशी बनतात हे दाखवतो. आयुष्य बदलले तरी, हे रंग कसे तसेच राहतात; ते केवळ रंग न राहता, लोकांच्या ओळखीच्या परिचित जागा बनतात; साध्या, सहज जुळणाऱ्या क्षणांच्या माध्यमातून हा चित्रपट यावर जोर देतो. हा चित्रपट एशियन पेंट्सचे दीर्घकाळ टिकणारे रंग केवळ भिंतींवरच राहत नाहीत, तर ते लोकांच्या मनातही घर करतात आणि कालांतराने घरांची खरी ओळख बनतात, ही जाणिव दृढ करतो.

ही मोहीम एशियन पेंट्ससाठी 'वॉरंटी'चा अर्थ काय आहे, हे प्रतिबिंबित करते. ही मोहीम केवळ दीर्घकाळ टिकणाऱ्या रंगाबद्दल नाही, तर भिंतींच्या सभोवताली निर्माण झालेल्या आठवणी आणि जिव्हाळ्याचे रक्षण करण्याच्या वचनाबद्दल देखील आहे.

आठ दशकांहून अधिक काळ, एशियन पेंट्स भारतातील लहान शहरांपासून ते मोठ्या महानगरांपर्यंत, घरांचा आणि हृदयांचा एक हिस्सा बनले आहेत. गेल्या वर्षीच्या मोहिमेने विश्वासाचा हा वारसा सजीव केला आणि देशभरातील लोक एशियन पेंट्सवर कसे अवलंबून असतात हे दाखवून दिले.

गेल्या वर्षभरात, 'दशकांचा विश्वास' (Decades of Trust) सारख्या छापील जाहिरातींपासून ते एशिया कप दरम्यान 'वॉरंटी काउंटडाउन' सारख्या सांस्कृतिक क्षणांपर्यंत, अनेक उपक्रमांद्वारे हा संदेश अधिक दृढ करण्यात आला.

# ZEE5 च्या वतीने १५ मे २०२६ रोजी तिघी'च्या वर्ल्ड डिजिटल प्रीमियरची घोषणा!

## चित्रपटगृहांतील तुफान यशानंतर कौतुकास पात्र ठरलेल्या मराठी कलाकृतीचे खास डिजिटल पदार्पण ZEE5 वर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चित्रपटगृहातील प्रदर्शना दरम्यान समीक्षकांची प्रशंसा आणि प्रेक्षकांचे अमाप कौतुक लाभलेला 'तिघी' 15 मे 2026 रोजी ZEE5 वर वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरसह जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. ही कलाकृती सुप्री ॲडव्हर्टायझिंग अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड निर्मित असून दिग्दर्शिका जीजिवीशा काळे यांचा पहिला चित्रपट आहे. तिघी हे कौटुंबिक गुंतागुंत, शांतता आणि नातेसंबंधांना आकार देणाऱ्या न सांगितलेल्या सत्यांचा शोध घेणारे




भावनिकदृष्ट्या भारलेले मराठी नाट्य आहे.

हा चित्रपट स्वाती रानडे-कर्णिक [नेहा पेंडसे बायस] या 40 वर्षीय महिलेचा मागोवा घेतो. जिचे मुंबईतील स्थिर जीवन वाढत्या वैयक्तिक आणि आर्थिक दबावाखाली उलगडण्यास सुरुवात होते. जेव्हा तिला कळते की तिची विभक्त झालेली आई, हेमलता रानडे [भारती आचरेकर] हिच्या आयुष्याचा शेवट जवळ येत आहे, तेव्हा स्वाती तिच्या बऱ्याच काळापासून मागे राहिलेल्या भूतकाळाला सामोरे जाण्यासाठी पुण्यातील तिच्या बालपणीच्या घरी परतते. तिथे ती आणि तिची धाकटी बहीण सारिका [सोनाली कुलकर्णी] पुन्हा एकत्र येतात. सारिका ही आजारी आईची काळजी घेत असते. आरोप, निराकरण न झालेला संताप आणि दीर्घकाळ दडपलेल्या जखमांमुळे पुनर्मिलन तणावपूर्ण आणि भावनिक होते. तीन स्त्रिया अपराधीपणा, राग आणि असहायतेशी झुंज देत असताना, आई स्वत:चे शेवटचे दिवस त्यांच्यापासून दूर आश्रमात घालवण्याची इच्छा व्यक्त करते. तेव्हा त्यांच्या नाजूक बंधाची कसोटी तीव्र होते.

आठवणी आणि शांततेने भरलेल्या घरात वसलेले, तिघी हे कुटुंब त्याग, रहस्ये आणि भावनिक अंतराच्या शक्तींद्वारे काय सहन करतात याचा एक मर्मस्पर्शी शोध कलाकृती घेते. याच शक्ती त्यांच्यात बंध निर्माण करतात आणि खंडित करू शकतात.

भारती आचरेकर, नेहा पेंडसे बायस आणि सोनाली कुलकर्णी यांच्यासह निपुण धर्माधिकारी, जैमिनी पाठक, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, मृण्मयी गोडबोले आणि संजय मोने यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटात अत्यंत सकस अभिनय वठवला आहे. जो या अनेक पदरी असलेल्या कथेला प्रामाणिकता आणि भावनिक सखोलता देतो.

प्रीमिअरबद्दल बोलताना, हेमा व्ही. आर., चीफ चॅनेल ऑफिसर- झी मराठी आणि बिझनेस हेड- ZEE5 मराठी म्हणाल्या, "ZEE5 मध्ये आम्ही मानवी अनुभव आणि भावनिक सत्यांमध्ये खोलवर रुजलेल्या कथा सांगण्यास वचनबद्ध आहोत. 'तिघी' हा एक जिव्हाळ्याचा आणि विचार करायला लावणारा चित्रपट आहे. ही कलाकृती प्रामाणिक तसेच संवेदनशीलतेने कौटुंबिक नातेसंबंधांचा शोध घेते. तिचा वर्ल्ड डिजिटल प्रीमिअर सादर करताना आणि ही आकर्षक कथा जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.